शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
04 Aug 2025 - Page 10 city

# के. के. वाघ इंजिनिअरिंगचा बूट कॅम्प



**नाशिक** । के.के. वाघ इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीरिंग एज्यूकेशन अँड रिसर्च संस्थेत चार दिवशीय रोटेटिंग मशिनरी बूटकॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. पदवीधर अभियंत्यांना रोटेटिंग मशिनरीच्या व्यावहारिक, उद्योग-संबंधित कौशल्याने सुसज्ज करणे कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. बूटकॅम्पमध्ये फिरत्या उपकरणांच्या डिझाइन, कार्यप्रणाली आणि निदानाची सखोल समज दिली जाते. मॉडेलीकॉन इन्फोटेक एलएलपीच्या अनुभवी व्यावसायिकांनी आयोजित केलेल्या या सत्रात मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागातील शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. योगेश पंडित यांनी स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करण्याचे आणि तांत्रिक कौशल्ये बळकट करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन संचालक डॉ. के. एन. नांदुरकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. पी. बी. कुशारे, प्रा. आर. व्ही. भंडारे आणि प्रा. ए. डी. भगुरे यांनी प्रयत्न केले.